# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे - ४११००७
# Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
संकेतस्थळ/Website: www.unipune.ac.in

**परिपत्रक क्र. 54 /2024**

**विषय : पीएच्.डी. संशोधक विद्यार्थ्यांना येणा-या समस्यांबाबत त्यांच्या बैठकीचे आयोजन करून अहवाल सादर करणेबाबत...**

मा. विभागप्रमुख/प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित संशोधन केंद्रे यांना कळविण्यात येते की, आपल्या संशोधन केंद्रांमध्ये अनेक विद्यार्थी विविध विषयांवर संशोधन करीत आहेत. या पीएच्.डी. संशोधक विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामध्ये संशोधन मार्गदर्शक व त्यांचेकडील विद्यार्थी यांच्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे वादविवाद होत असतात. तसेच एकमेकांविषयी असलेल्या तक्रारी/निवेदने विद्यापीठाकडे लेखी स्वरूपात न दाखल होता तोंडी स्वरूपात प्राप्त होतात. त्यामुळे अशा तोंडी तक्रारीवर कार्यवाही करता येत नाही. परंतु अशा तक्रारी आपल्याकडे प्राप्त होत असतील तर त्याची वेळीच दखल घेऊन त्याचे निराकरण करावे. पीएच्.डी. बाबत कोणतेही चुकीचे काम होणार नाही, याची सर्वांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन खालीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

1. सर्व संशोधन केंद्रांच्या प्रमुखांनी आपापल्या संशोधन केंद्रातील सर्व संशोधन मार्गदर्शकांची ऑफलाईन/ऑनलाईन पध्दतीने बैठकीचे आयोजन करावे. सदर बैठकीमध्ये संशोधन हा भाग महत्वाचा आहे तसेच संशोधनाची गुणवत्ता टिकवताना विद्यार्थ्यांची कोणत्याही प्रकारची अडवूणक/नुकसान/दिरंगाई होणार नाही, याबाबत दक्षता घेण्यास सांगावे.
2. सर्व संशोधन केंद्रांच्या प्रमुखांनी आपापल्या संशोधन केंद्रात पीएच्.डी . करिता नोंदणीकृत असणा-या संशोधक विद्यार्थ्यांचे विषयनिहाय ऑफलाईन/ऑनलाईन पध्दतीने बैठकीचे आयोजन करावे. विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या अडी - अडचणी असल्यास त्यांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना तातडीने करावी.

संशोधन केंद्रांमध्ये संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताची काळजी घेणे आपले महत्वाचे कर्तव्य आणि जबाबदारी आहे. यासंदर्भात वरील मुद्दा क्र. 1 व 2 अन्वये बैठकींचे आयोजन करून दि. 16 एप्रिल, 2024 पर्यंत शैक्षणिक प्रवेश विभागास त्याचा **अनुपालन अहवाल सादर करावा.**

संशोधन विषयक कोणतेही काम अकारण अडणार नाही, याची दक्षता घ्यावी. यापुढे असेही कळविण्यात येते की, सर्व संशोधन केंद्रांचे अहवाल विद्यापीठास प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संशोधन केंद्र प्रमुखांच्या बैठकीचे आयोजन विद्यापीठामार्फत करण्यात येईल.

गणेशखिंड, पुणे 411007 )
संदर्भ: शै.प्रवेश/ 1001 )
दिनांक: 01/04/2024 )

1/4/2024

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

1. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
2. मा. प्राचार्य/संचालक, विद्यापीठाशी संलग्नित सर्व संशोधन केंद्रे/संस्था.